## संक्षिप्त वृत्त



**करमाळा :**मौलाली नगर परिसरात अनेक शाळांचे विद्यार्थी या वृक्षलागवडीत सहभागी झाले होते.

### ३८ सेकंदामध्ये ४ हजार २७८ वृक्षलागवडीचा विश्वविक्रम

**करमाळा** : खरेदी विक्री संघांचे चेअरमन, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक युवक नेते शंभूराजे जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ३८ सेकंदात ४ हजार २७८ वृक्षलागवडीचा विश्वविक्रम शुक्रवार दि. १६ रोजी करण्यात आला. यावेळी एकूण ४ हजार ७०० झाडे लावण्यात आली. शहरातील मौलाली नगर परिसरात महात्मा गांधी विद्यालयासह शहरातील अनेक शाळांचे विद्यार्थी या वृक्षलागवडीत सहभागी झाले होते. यावेळी सहायक आयुक्त वीणा पवार, मुख्याधिकारी सचिन तपसे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव विठ्ठल क्षीरसागर, वनाधिकारी नंदर्गे, ड. नवनाथ राखुंडे, संदीप सरडे, शुभम बोराडे, सोमा पठाडे, रेखा परदेशी, ज्योतीराम ढाणे, विक्रम ढाणे, ग्लोबल इंग्लिश मीडियम स्कूलच्या एलिझाबेथ आसादे, स्वराज अकॅडमीचे विद्यार्थी व शिक्षक तसेच अनिल सुरवसे भाऊसाहेब, इजराइल कुरेशी, रील स्टार दिक्षा शिंदे, साहिल मुलाणी, आफताब मुलाणी, रियाज सय्यद, आकाश सिंधी, गुरू चव्हाण, अतुल देवकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी सहभाग घेतला होता.

---

### अनकढाळचे कोतवाल विलास चव्हाण यांचा सन्मान




**नाझरे** : अनकढाळ ता सांगोला येथील कोतवाल विलास चव्हाण यांना सेवानिवृत्ती बाबत तसेच आदर्श कोतवाल म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. कोतवाल हा महसूल विभागाचा कणा असून, महसुली कामाव्यतिरिक्त निवडणूक, नैसर्गिक आपत्ती, शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजना व इतर उपक्रम राबवण्यात त्यांचा मोठा सहभाग आहे. तसेच महसूल पंधराव्या निमित्त तहसीलदार संजय कणसे, नायब तहसीलदार सोमनाथ साळुंखे यांनी विलास चव्हाण यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेऊन महसूल पंधरवडा अभियान २०२४ चे औचित्य साधून चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला. चव्हाण यांनी तलाठी कार्यालयातील सर्व कामे समन्वय, सहकार्य, व सामाजिक दृष्टिकोन याचा योग्य मेळ घालून केलेली होती त्याबद्दल त्यांच्या कामाची प्रशासनाने दखल घेतली व सत्कार केला. यावेळी मंडलाधिकारी हरिश्चंद्र जाधव, तलाठी संघटनेचे तालुकाध्यक्ष गौतम ठोकळे, सचिव समाधान सूर्यागन, नवनाथ इंगोले, गोविंद केंगार, सुनील कोळी, तलाठी, कोतवाल व महसूल कर्मचारी उपस्थित होते.



**तांदूळवाडी येथे सकल समाज मराठा बांधवांच्या वतीने मराठा समाजाला ५० टक्केच्या आत आरक्षण मिळावे यासाठी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांना निवेदन देण्यात आले.**

### सकल मराठा समाजाच्यातर्फे मराठा आरक्षणासाठी निवेदन

**वेळापूर** : तांदुळवाडी तालुका माळशिरस येथे माढा खासदार धैर्यशील मोहिते पाटील हे आले असता त्यांच्या हस्ते संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या नावाचा चौकाचा फलक याचे उद्घाटन करण्यात आले व त्यांना सकल मराठा समाज बांधव तांदुळवाडी यांच्यावतीने मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून ५० टक्केच्या आत आरक्षण मिळावे याबाबत आरक्षणासंदर्भात मागण्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी सकल समाज मराठा बांधव उपस्थित होते.

---

### लवंग येथे विश्वरत्न ग्राम संघाची सर्वसाधारण सभा

**अकलूज** : लवंग (२५/४) (ता. माळशिरस) येथे विश्वरत्न ग्राम संघाची सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.या सभेसाठी लवंग गांवचे सरपंच प्रशांत पाटील, ग्रामसेवक भाऊसाहेब मोहन मिटकल, लवंग विकास सोसायटीचे चेअरमन धनाजी भोळे, फिनिक्स इंग्लिश स्कूलच्या संस्थापिका अध्यक्षा नूरजहाँ शेख, अस्मिता लोक संचलित केंद्राचे लेखापाल अमोल, सीआरपी वैशाली कांबळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**नोकरीविषयक**
**नामांकित कंपनीत फुलटाईम/पार्ट टाईम** मुले-मुली, महिला पाहिजेत. पगार ६ ते १५ हजार. शिक्षणाची अट नाही. पत्ता : नवीन बस स्टँडसमोर, अकलूज. मो. ७३५०६३६९६२, ९१५८७७०१६७ (२८८२४)

अस्सल सोलापुरी सुराज्य सोलापूर
Classified

**निवेदन :** या अंकात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आवाहनाच्या सत्यतेबाबत 'सुराज्य' हमी घेऊ शकत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

# उद्योजक खरे यांच्या हस्ते येवती रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

## चार रस्त्यासाठी ८० लाखांचा निधी मंजूर

**पंढरपूर/प्रतिनिधी**

मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे संभाव्य उमेदवार उद्योजक राजू खरे यांनी केलेल्या मागणीनुसार मोहोळ तालुक्यातील येवती येथील चार रस्त्यासाठी ८० लाखाचा निधी मंजूर करण्यात आला होता. या रस्त्यांचे कामाचा शुभारंभ राजू खरे यांच्या हस्ते रविवारी करण्यात आला.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत मातोश्री ग्राम समृद्ध शेत पानंद रस्ते मधून रस्ते मंजूर करण्यात आले आहेत.



**मोहोळ : येवती येथील रस्त्यांचे कामाचा शुभारंभ राजू खरे यांच्या हस्ते भूमीपूजन करताना.**

या मंजूर करण्यात आलेल्या रस्त्यामध्ये येवती येथील नेताजी भोंगाळे शेत ते तुंगत नाला रोड २० लाख, आबासाहेब राजगुरू शेत ते धनाजी भोंगळे शेत रस्ता२० लाख, पाटोळे वस्ती ते भोंगाळे वस्ती२० लाख,येवती पापरी रस्ता ते सचिन कवडे वस्ती रस्ता, २० लाख. असे एकूण ८०लाख रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

याप्रसंगी शुभारंभ प्रसंगी येवती गावचे सरपंच बालाजी खुर्द, सर्जेराव दाजी चवरे ज्योतीराम गोडसे, पापरी गावचे सरपंच, सौदागर खडके, नेपतगाव सरपंच पांडुरंग फरकाळे, रामहिंगणी सरपंच संभाजी लेंगरे, पाटकुल गावचे उपसरपंच गणेश नामदे, शिवसेना तालुकाप्रमुख संभाजी बंडलकर, धनंजय खरे किरण पाटोळे, योगेश भोंगळे, विजय खरे, मौला बागवान, शिवा पवार, तात्या खुर्द, विनोद खुर्द, शुभम शितोळे, संदेश रंदवे, समाधान यादव, संजय मस्के, समाधान बाबर, मधुकर शितोळे, कालिदा शितोळे, अविष्कार शिंदे, आप्पा शितोळे, आनंद राजगुरू, सुधाकर शितोळे, अण्णा गोडसे, अशोक पाटोळे, बाळासाहेब पाटोळे शामराव व्यवहारे, माजी सरपंच संतोष शितोळे, पोपट गोडसे, नवनाथ भंडलकर, सचिन शितोळे, राहुल नागटिळक, अंकुश खुर्द, चंद्रकांत खुर्द, मुकेश गोडसे, आनंद जाधव, संजय गोडसे, समाधान साठे, अनिल खुर्द, नाना नवगिरे, अरुंद गोडसे, पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक यांच्यासह आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शेलगाव(क) येथील ग्रामदैवत नागनाथ महाराजांची यात्रा



**करमाळा** : श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी भरणाऱ्या तालुक्यातील शेलगाव (क) चे ग्रामदैवत नागनाथ महाराजांच्या यात्रेनिमित्त सालाबाद प्रमाणे याही वर्षी विविध उपक्रमांचे आयोजन केले गेले आहे. यात्रेनिमित्त किर्तन, पालखी सोहळा, प्रबोधन रुपी भारुड, महाप्रसाद अशा धार्मिक उपक्रमांसह रक्तदान शिबिराचे ही आयोजन करण्यात आले आहे.

यात्रेच्या आदल्या दिवशी म्हणजे रविवारी रात्री किर्तन सोहळा झाल्यानंतर आज सोमवारी सकाळी ८ते१० या वेळेत गावातून नागनाथ महाराजांची पालखी काढण्यात येणार आहे. यानंतर १० ते २ या वेळेत राज्यभरातून आलेल्या नामांकित प्रबोधनकार, भारूडकार यांच्या भारुडांचा कार्यक्रम होणार आहे. या भारुडाच्या कार्यक्रमातून मनोरंजनातून प्रबोधन करण्यात येते. भारुडाचा कार्यक्रम संपल्यानंतर दुपारी २ नंतर महाप्रसाद होईल. रात्री ९ वाजता नागनाथ महाराजांची छबिना मिरवणूक काढली जाईल. यात्रेदरम्यान सामाजिक बांधिलकी म्हणून गावातील युवकांकडून रक्तदान शिबिराचे आयोजनही करण्यात आले आहे. या शिबिरात रक्तदात्यांनी रक्तदान करून राष्ट्रीय कार्यात सहभागी होण्याचे आवाहन यात्रा कमिटीने केले आहे.

शेलगाव (क) चे ग्रामदैवत नागनाथ महाराज हे जागृत देवस्थान मानले जाते. पंचक्रोशीतील सौंदे, वरकटणे, देवळाली, अर्जुननगर, फिसरे आदी गावांतील भाविक मोठ्या संख्येने या यात्रेमध्ये सहभागी होतात. तालुक्यातील नागरिकांनी या सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## अन्नपूर्णा नमकीनतर्फे रक्षाबंधन खरेदीवर बक्षिस योजना



**सोलापूर** : गेल्या ४३ वर्षापासून सोलापूर व पुण्यात मिठाई उत्पादन क्षेत्रात नावलौकिक असलेल्या तिवाडी अन्नपूर्णा नमकीन च्या वतीने रक्षाबंधन ते दिवाळी भाऊबीज पर्यंत खरेदीवर बक्षिसांची आकर्षक योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये लकी ड्रॉ द्वारे दुबई टूर, सोन्या - चांदीचे नाणे मिळवण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे, अशी माहिती उत्पादक उद्योजक नंदकिशोर तिवाडी यांनी पत्रकार परिषदेत दिली. ५० हजार रुपयाची खरेदी केल्यास एक कुपन मिळेल. यावर दुबई टूरची दोन बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. मुंबई टू दुबई, दुबई टू मुंबई असा प्रवास यामध्ये राहणार आहे. एका व्यक्तीसाठी तीन दिवस व दोन रात्र यामध्ये विमान प्रवास हॉटेलमधील निवास व तीन दिवस नाश्ता व एक दिवस जेवण अशी सुविधा उपलब्ध राहणार आहे. २० हजार रुपयांच्या खरेदीवर एक कुपन मिळेल. ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे नाणे अशी २ बक्षीस आहेत. तर ५ हजार रुपयांच्या खरेदीवर एक कुपन देण्यात येईल. यासाठी १०० बक्षिसे ठेवण्यात आले आहेत. यासाठी दहा ग्रॅम वजनांची चांदीची नाणे बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहेत. या योजनेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर दिलेल्या कुपन मधून साधारणता : १ डिसेंबर २०२४ रोजी लकी ड्रॉ पद्धतीने सोडत काढण्यात येणार आहे.

## सावित्रीबाई वसतिगृहाच्या परिसरात स्वच्छता मोहीम

**सोलापूर** : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींच्या वस्तीगृहाच्या संस्थापिका अध्यक्ष सायरा शेख ह्या इयत्ता ५ वी १० वी च्या सावित्रींच्या लेकींचे नेतृत्व करीत आहे. १५ ऑगस्टचे औचित्य साधून वस्तीगृहाच्या परिसराची श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबवली.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींच्या वस्तीगृहाच्या वतीने सावित्रीच्या लेकी १५ ऑगस्टचे औचित साधून स्वच्छता मोहिम घेण्यात आली.



**सोलापूर : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मागास्वर्गीय मुलींच्या वस्तीगृहाच्या अध्यक्ष सायरा शेख व विद्यार्थ्यांनी स्वच्छता करताना.**

यावेळी, आरोग्य सांभाळा, परिसर स्वच्छ ठेवा, असा संदेश विद्यार्थ्यांनी दिला. या वेळी विद्यार्थ्यांनींनी स्वच्छतेची शपथ घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी हातात झाडू अन् टोपले, तोंडाला मास्क, हॅन्डग्लोव्हज घालून वसतीगृहाच्या मुलीं स्वच्छतादूत म्हणून सर्वसामान्यांच्या कुतूहलाचा विषय ठरल्या होत्या. या स्वच्छतादूतांनी वस्तीगृहाच्या मजरेवाडीच्या परिसरात दाखल होत थेट स्वच्छता मोहीमेला सुरुवात केल्याने बहुतांश भागातील कचरा थेट शहराबाहेर पोहचला होता. विद्यार्थीनींनीही यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. याचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींच्या वस्तीगृहाच्या संस्थापिका अध्यक्ष सायरा शेख, वस्तीगृहाच्या अधिक्षका कायनात शेख, नाजनीन शेख, अनिल गायकवाड व सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माळशिरस येथे संविधान जागर यात्रेचे जल्लोषात स्वागत

**पिलीव** : संविधान जागर समिती महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने महाराष्ट्र भर संविधान जागर यात्रा फिरणार असून त्याची सुरुवात ९ ऑगस्ट रोजी महाड येथील चवदार तळ्यापासून सुरुवात झाली.

गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये देशभर भारतीय जनता पार्टी संविधान बदलणार असा अपप्रचार केल्याने अनुसूचित जाती व मागासवर्गीय समाजामध्ये संभ्रम निर्माण झाला होता. त्याला उत्तर देण्यासाठी संविधान जागर यात्रेचे आयोजन करण्यात आले असून ही यात्रा महाराष्ट्रभर फिरणार आहे. १६ ऑगस्ट रोजी माळशिरस येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर रॅलीचे जंगी स्वागत माळशिरस तालुक्याचे लोकप्रिय आमदार रामभाऊ सातपुते यांच्या वतीने करण्यात आले.

यावेळी नगरसेवक आकाश सावंत, ज्येष्ठ नेते बुवा नाना धाईजे, राजू सावंत, दत्तू सावंत, यशवंत मोहिते सह अनेक समाज बांधव उपस्थित होते. त्याचबरोबर राजेंद्र गायकवाड व योजना ठोकळे याही उपस्थित होत्या.

## अल्पवयीन मुलीला पळवून नेल्या प्रकरणी गुळसडीच्या एकावर गुन्हा दाखल

**करमाळा/प्रतिनिधी**

अल्पवयीन शाळकरी मुलीला फूस लावून पळवून नेल्याची घटना तालुक्यातील गुळसडी येथे घडली आहे. सदर मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून करमाळा पोलिसांनी गुळसडीच्या एका विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.




याबाबत सदर मुलीच्या आईने दि. १४/०८/२४ रोजी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, गुळसडीच्या माध्यमिक शाळेत शिकणारी त्यांची १४ वर्षीय मुलगी ही दि. १४ रोजी सकाळी शाळेत जाते असे सांगून गेली होती. मात्र शाळा सुटल्यावर नेहमीप्रमाणे सायं. ४.३० वाजता ती घरी परतल्याने भावासोबत मिळून तिचा शोध घेतला. शोध घेत असताना रस्त्याच्या कडेला गुरे राखणारे फिर्यादीच्या वडीलांनी गावातीलच अविनाश बाळकृष्ण कांबळे हा सदर अल्पवयीन मुलीला मोटारसायकल वर बसवून घेऊन गेला असल्याचे सांगितले. वडीलांनी दिलेल्या माहीतीवरून मुलीला अविनाश याने कशाचे तरी आमिष दाखवून पळवून नेल्याची खात्री फिर्यादीस झाली आणि त्यांनी करमाळा पोलिसांत तक्रार दिली आहे.

सदर अल्पवयीन मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून करमाळा पोलिसांनी कांबळे याच्यावर भारतीय न्याय संहीता (बी.एन.एस.) २०२३ च्या कलम १३७ (२) नुसार गुन्हा दाखल केला असून पोलिस उपनिरीक्षक व्ही.व्ही. माहूरकर हे पुढील तपास करीत आहेत.

## छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल

### एक जण अटकेत

**करमाळा** : सासरच्या जाचास कंटाळून विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना करमाळा तालुक्यातील वाशिंबे येथे घडली आहे. याप्रकरणी विवाहितेच्या वडिलांनी सासरच्या लोकांविरुद्ध करमाळा पोलिसांत फिर्याद दिली असून करमाळा पोलिसांनी यांपैकी एकाला ताब्यात घेतले आहे.

याबाबत मयत विवाहितेचे वडील विठ्ठल श्रीरंग घाडगे (रा. झरे, ता. करमाळा) यांनी करमाळा पोलिसांत रविवारी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांची मोठी मुलगी कल्याणी (वय-२६ वर्षे) हिचा विवाह वाशिंबे गावातील प्रकाश पंढरीनाथ झोळ यांचे सोबत झाला होता. त्यानंतर सोळव्यापासूनच पतीसह सासू-सासरे आणि दोन नणंदा यांनी घरगुती कारणांवरून कल्याणीचा शारीरिक व मानसिक छळ करण्यास सुरुवात केली. पतीचे दुसरे लग्न करून देऊ असे सांगत माहेरहून एक लाख रुपये आणण्यासाठी सासू-सासऱ्यांनी सतत शिवीगाळ करत असल्याचे कल्याणीने सांगितले होते. त्यानंतर कल्याणीच्या सासरच्यांची समजूत काढूनही पती प्रकाश याच्यासह सासरच्यांनी तिला त्रास देणे सुरूच ठेवले होते.

या सर्व जाचाला कंटाळून मुलगी कल्याणी प्रकाश झोळ हिने दि. १७ ऑगस्ट रोजी आत्महत्या केली असल्याने विठ्ठल घाडगे यांनी तिचा सासरा पंढरीनाथ झोळ, सासू कौसाबाई झोळ, पती प्रकाश झोळ, (रा. वाशिंबे, ता.करमाळा), नणंद मोहिनी संजय खेडकर (रा. पेडगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर) आणि नणंद प्रमिला निलेश जाधव (रा. जिंती, ता. करमाळा) यांनी आपापसांत संगनमत करून मुलगी कल्याणी हिला माहेरुन एक लाख रुपये घेवुन येण्याचे कारणावरून मानसिक व शारिरिक त्रास देवुन तिला आत्महत्येस प्रवृत केले असल्याची फिर्याद दिली आहे. घाडगे यांच्या फिर्यादीवरून करमाळा पोलिसांनी मयत विवाहितेचा सासरा पंढरीनाथ झोळ याला अटक केली असून करमाळा न्यायालयात उभे केले असता त्याला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस उपनिरीक्षक संदीप बनकर या घटनेचा तपास करत आहेत.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या संवाद मेळाव्याला महिलांचा प्रतिसाद

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी थेट प्रक्षेपणद्वारे उपस्थित महिलांशी संवाद साधला

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा संवाद मेळावा रविवारी वागदरी रस्त्यावरील टिनवाला फंशक्न हॉल येथे हजारो महिलांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी थेट प्रक्षेपणद्वारे उपस्थित महिलांशी संवाद साधले. अक्कलकोट विधानसभा मतदार संघातील बहिणींना भेट वस्तु व मिठाई देऊन सत्कार करण्यात आले.

दरम्यान आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष शिवानंद पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन, माजी नगरसेवक महेश हिंडोळे, मिलन कल्याणशेट्टी, अप्पु बिराजदार, जयशेखर पाटील, शांभवीताई कल्याणशेट्टी, जिल्हा सरचिटणीस सुरेखा होळीकट्टी, लाडकी बहिण योजनेचे अशासकीय सदस्य अमोल हिप्परगी, महेश बिराजदार, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अप्पु परमशेट्टी, महेश पाटील, शंकर भांजी, सलगरचे युवा नेते शिवराज बिराजदार, बसवराज शेळके, नन्नुभाई कोरबु, जकापूर सरपंच लक्ष्मीबाई वंटे, माजी सरपंच दिपाली आळगी, जयश्री बटगेरी, विश्रांती पाटील, सोनाली शिंदे, पुजा राठोड, भागुबाई कुंभार, धनंजय गाढवे, प्रकाश पाटील, बसवराज थंड आदींची प्रमुख उपस्थिती होते.

या कार्यक्रमात आमदार सचिन कल्याणशेट्टी, शिवानंद पाटील, महेश हिंडोळे, अमोल हिप्परगी, सुरेखा होळीकट्टी आदींनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी अक्कलकोट विधानसभा मतदार संघातील ग्रामपंचायत महिला सरपंच, उपसरपंच, महिला सदस्य, नगरसेवक, महिला भाजपा पदाधिकारी, महिला आघाडी सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, नेते, माजी नगरसेवक, युवा मोर्चा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- द्रेवंद्रजी, सचिनजी तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है असे म्हणत हात उंचावुन तब्बल आठ ते दहा हजार पेक्षा जास्त महिलांनी आश्रिवाद दिला.
- महाराष्ट्रात एकाच वेळी लाईव्ह थेट प्रक्षेपण –भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा संवाद मेळावा संपन्न झाला.
- आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना लाडक्या बहिणीनी राख्या बांधल्या. द्रेवेंद्र व सचिन भाऊ च्या लाडक्या बहिणींना भेट वस्तु व मिठाई भेट देण्यात आले.

